# दिनांक 10/03/2025

1 कर्जत पोलीस ठाणे हदीत दिनांक 08/03/2025 रोजी 19:00 वा च्या सुमारास मौजे.नालदेवाडी,पो.सुगवे ता.कर्जत येथे महिला फिर्यादी हे घराचे समोरील अंगणामध्ये बसले असता इलेक्ट्रीक डी.पी दुरुस्तीचे काम चालु असतांना रात्रौ 07.00 वाजता त्याठिकाणी फिर्यादी हे वायरमन यांना म्हणाल्या की,कोणीतरी चांगला जाणकार वायरमन आणायचा डी.पी जळुण कमी जास्त झाल असत तर आमची घर जवळ आहेत. त्यामुळे आम्हाला धोका आहे असे फिर्यादी त्यांना बोलत असतांना तेथे उभे असलेला आरोपी नं.01 यांनी त्याठिकाणी असलेला लाकडी दांडका घेवुन फिर्यादी यांचा मुलगा याचे उजव्या कानाच्या वरील डोक्यावर उपट मारुन दुखापत केली. त्यानंतर 04 आरोपित यांनी फिर्यादी व त्यांचा मुलगा यांचे छातीवर हाताबुक्यांनी मारहाण करित असताना फिर्यादी यांची भावजय हे फिर्यादी यांना सोडविण्यासाठी आले असता तीला सुध्दा यांनी संगनमत करुन बेकायदेशीर जमाव करुन त्यांना हाताबुक्यांनी मारहाण केली तसेच फिर्यादी यांच्या गळयात असलेले सोन्याचे मंगळसूत्र तुटून कोठेतरी गहाळ झाले आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे गु.र.नं.63/2025, भारतीय दंड संहीता कलम 118(1), 115(2),352,351(2)(3),324(4),189(2),191(2),191(3),190 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/अण्णासाहेब तोरवे हे करीत आहेत.

2. माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 08/03/2025 रोजी 06:00 वा च्या सुमारास मौजे परळ मुंबई ते उलवे ते पाली ते इंदापुर ता.माणगाव अशा प्रवासादरम्यान महिला फिर्यादी ह्या परळ मुंबई येथुन उलवे ते पाली असे श्री.बल्लाळेश्वर मंदीर पाली येथुन दर्शन घेवुन स्वतःचे मालकीचे कारने खेड कडे जात असताना गणेश फरसाण मार्ट इंदापुर, ता.माणगांव येथे फरसाण खरेदी व वॉशरूम करीता थांबले. फिर्यादी हे वॉशरूम करून आल्यानंतर फिर्यादी याचे लक्षात आले की त्यांचे हॅण्ड पर्सला कट मारून त्यांचे मालकीची एकूण 3,21,000/-रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीशीवाय लबाडीचे हेतुने स्वतःचे फायदयाकरीता नेले.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे येथे गु.र.नं.59/2025, भारतीय न्याय संहिता कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सपोनि/श्री.मारुती बेलदार हे करीत आहेत.

3. नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 31/01/2025 रोजी 07:00 वा च्या सुमारास मौजे बेडिसगाव शाळेची वाडी महिला फिर्यादी यांचे राहते घरात ता.कर्जत येथे फिर्यादी या कामाला गेलेल्या असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचे घराच्या बेडरूमची खिडकी उघडून त्यावाटे आतमध्ये प्रवेश करून बेडरूम मध्ये असलेली शेलू ग्रामपंचायतीची सीसीटिव्ही कॅमेराची टि.व्ही व फिर्यादी यांचे लाकडी कपाटामधील लॉकरचा लॉक उपकून त्यामधील बाजुस नमुद 73,000/-रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने लबाडीच्या इरादयाने स्वत:चे फायद्याकरीता फिर्यादी यांचे संमत्तीशिवाय घरफोडी चोरी करुन नेले.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं.32/2025, भारतीय न्याय संहिता कलम 303(a),331(3),331(4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.किशोर किसवे हे करीत आहेत.

4. नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 08/03/2025 रोजी 13:30 वा च्या सुमारास मौजे वरदविनायक सोसायटी रूम नंबर 301 कोल्हारे फिर्यादीचे राहते घरातुन ता.कर्जत येथे पिडीत कुमारी वय -15 वर्षे 1 महिने ही अल्पवयीन असल्याचा फायदा घेवुन कोणीतरी अज्ञात इसमाने तीच्या अज्ञाणपणाचा फायदा घेवून अज्ञात कारणा करीता तीस फुस लावून पळवून नेले असावे.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं. 33/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 137 (2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.गच्चे हे करीत आहेत.

5. कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 08/03/2025 रोजी 13:30 वा च्या सुमारास मौजे वरदविनायक सोसायटी रूम नंबर 301 कोल्हारे महिला फिर्यादीचे राहते घरातुन ता.कर्जत येथे फिर्यादी हया त्यांचे किराणा दुकानात बसले असताना त्यांच्या शेजारी राहणारा आरोपीत रा. नसरापुर ता.कर्जत याने फिर्यादी यांना साखर विकत पाहीजे असे बोलले असता फिर्यादी हया साखर देण्यास गेले असताना आरोपीत याने फिर्यादी यांना पाठीमागुन मिठी मारुन फिर्यादी यांचे गाउन मध्ये हात घालुन विनयभंग करुन फिर्यादी यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे गु.र.नं.64/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 74 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.भागवत हे करीत आहेत.

6. रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 09/03/2025 रोजी 12:15 वा च्या सुमारास मौजे रेवदंडा पोलीस ठाणे समोरील सार्वजनिक रोडवर, अलिबाग येथे आरोपीत क्र.01 यांचे मालकीचे पिकअप टेम्पो क्रमांक एम.एच.06बी.डब्लु या वरील चालकांनी सदरचा टेम्पो हा साळाव चेक पोस्ट ते बोर्ली अशा जाणा-या सार्वजनिक रोडवर वाहतुकीस अडथळा होईल अशा रितीने लावल्याने सदर ठिकाणी शांसकीय कर्तव्य बजावत असलेले फिर्यादी यांनी सदर टेम्पो वरील चालकास कारवाई करण्या करता पोलीस ठाणे येथे घेवुन आले असता आरोपीत क्रमांक 01 व 02 हे पोलीस ठाण्यात येवुन फिर्यादी यांच्याशी अरेरावीची भाषा करु लागल्याने फिर्यादी यांनी

त्यांना पोलीस ठाण्यातुन बाहेर निघुन जाण्यास सांगितले त्यांचा आरोपीत क्रमांक 01 व 02 यांना राग येवुन तसेच आरोपीत क्रमांक 01 यांचे पिकअप टेम्पो वर फिर्यादी करवाई करीत असल्याने त्या रागातुन आरोपीत यांनी आपसात संगण्नमत करुन फियादी टेप्पोची कागदपत्रे आणण्यासाठी पोलीस ठाणे चे बाहेर आले असता फिर्यादी हे सरकारी गणवेशात त्यांचे कर्तव्य बजावत आहेत हे माहीत असताना आरोपीत क्रमांक 01 यांने फिर्यादीचे शर्ट, पकडुन,खेचुन हाताबुक्याने मारहाण करुन हातातील असलेला दगड मारला तो डावे हाताचे पंजास लागुन दुखापत झाली तसेच उजव्या हाताचे मनगटावर खरचटले, सदर वेळी आरोपीत क्रमांक 02 हा आरोपी क्रमांक 01 याला मारमार असे बोलुन फिर्यादी यांचे अंगावर मारण्यासाठी धावत येवुन फिर्यादीशी केलेल्या झटापटीत फिर्यादीचे पोलीस वर्दीवरील नंबर प्लेट व शर्टचे बटने  तोडुन नुकसान करुन फिर्यादी हे शासकीय गणवेशात शासकीय कर्तव्य बजावत असताना ते कर्तव्य पार पाडण्या पासुन धाकाने परावृत्त करण्यासाठी आरोपीत क्रमांक 01 व 02 यांनी संगनमत करुन फिर्यादीवर हमला करुन दुखापती केले.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.28/2025, भारतीय न्याय सहीता 2023 चे 123, 121(1),324(2),3(5),प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.दगू गांगुर्डे हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 09.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 339 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून  3,43,700/-रुपये इतका दंड आकारला आहे.